**नागपूर महानगरपालिका, नागपूर**

**(जनसंपर्क विभाग)**

**<u>प्रसिद्धी पत्रक                    ता. १ जानेवारी २०२०</u>**

# रस्ते आणि फुटपाथ मोकळे करण्याच्या कारवाईला सुरूवात

## मंगळवारी झोनमधील अवस्थी नगर येथे मनपातर्फे कारवाई

**नागपूर, ता. १ :** मनपा आयुक्तांच्या आदेशानुसार शहरातील रस्ते आणि फुटपाथ मोकळे करण्याच्या कारवाईला बुधवारी (ता.१) सुरूवात झाली. झोनस्तरावर मनपा आयुक्तांच्या आदेशाची अंमलबजावणी करीत रस्ते व फुटपाथ मोकळे केले जात आहेत. बुधवारी (ता.१) मंगळवारी झोन अंतर्गत अवस्थी नगर येथील फुटपाथवर लावण्यात आलेली दुकाने हटविण्याची कारवाई करण्यात आली.

नागपूर महानगरपालिकेद्वारे १ जानेवारी २०२० पासून रस्ते आणि फुटपाथ मोकळे करण्याची कारवाई करण्याबाबत मनपा आयुक्त अभिजीत बांगर यांनी आदेश जारी केले होते. त्यानुसार बुधवारी (ता.१) मंगळवारी झोनचे सहायक आयुक्त हरीश राउत यांच्या नेतृत्वात मनपा उपद्रव शोध पथक व मंगळवारी झोनचे कनिष्ठ अभियंता श्री. सोनवणे व श्री. वानखेडे यांच्याद्वारे कारवाई करीत फुटपाथवर व्यवसाय करणा-यांची दुकाने हटवून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

शहरातील रस्ते, फुटपाथवरील अतिक्रमणाबाबत नागरिकांच्या वाढत्या तक्रारीवर दखल घेत महापौर संदीप जोशी यांनी ज्येष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी यांच्या अध्यक्षतेत समिती गठीत केली होती. शहरातील रस्ते व फुटपाथ मोकळे करून नागरिकांना दिलासा देण्याबाबत कारवाई सुरू करण्यात आली आहे. अतिक्रमणाच्या समस्येपासून नागरिकांना दिलासा मिळावा यासाठी ही

मोहिम तिव्रतेने राबविण्यात येणार असून. दिवसासह रात्रीही रस्ते व फुटपाथ मोकळे करण्याची कारवाई करण्यात येणार आहे.

नागरिकांनी आपली जबाबदारी लक्षात घेउन फुटपाथवर कोणतेही व्यवसाय करू नये, असे आवाहन नागपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात आले आहे.